महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

६ वा मजला, विस्तारित इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

जाहिरात

जाहिरात क्र. GAD/६९/२०२६-Lokshahi Din. **दिनांक:-३० ऑक्टोबर,२०२६**

विषय : महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक व छत्रपती संभाजीनगर विभाग या पदांवरील नियुक्तीसाठी अर्ज मागविण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची स्थापना केली आहे. सदर आयोग हा अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यास नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी कार्यरत आहे. आयोगाचे मुख्यालय बृहन्मुंबई येथे असून, आयोगामध्ये राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त व सहा राज्य सेवा हक्क आयुक्तांचा समावेश आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांचे क्षेत्र वगळता प्रत्येक महसुली विभागासाठी एक राज्य सेवा हक्क आयुक्त नियुक्त करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक व छत्रपती संभाजी नगर विभाग या पदांवरील रिक्त होणाऱ्या पदांवर नियुक्ती करण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. रिक्त पदांची संख्या:-

राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक विभाग :- १ पद.

राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग :- १ पद.

एकूण रिक्त पदे २.

२. इतर अटी व शर्ती:-

(१)मुलभुत पात्रता :- अर्जदार हे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या कलम १३ (५) अन्वये शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील.

(२)किमान अनुभव :- अर्जदारास शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरणातील कामकाजाचा किमान २० वर्षाचा अनुभव असावा.

(३)वयोमर्यादा :- अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्जदाराचे किमान वय ४५ वर्षे व कमाल वय ६२ वर्ष इतके असावे.

(४)शिक्षण :- अर्जदार हा कोणत्याही शाखेतील किमान पदवीधर असावा.

(५)आवश्यक कौशल्ये :-अर्जदाराकडे संबंधित कायद्यांचे ज्ञान, अर्ध-न्यायिक कार्यपद्धतीची जाण, पारदर्शकता, प्रशासकीय नेतृत्व व निर्णयक्षमता असावी.

(६)अर्ज सादरीकरणाशी संबंधित अटी :- अर्ज निर्धारित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील, सविस्तर बायोडेटा, अनुभव विवरण, कार्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

(७)शपथपत्र :-अर्जदाराने त्याच्याविरूद्ध कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे, फौजदारी खटला प्रंलबित नसल्याचे व शासकीय निम-शासकीय सेवेत असल्यास शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रलंबित अथवा प्रस्तावित नसल्याचे शपथपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

(८) अर्ज शुल्क : अर्ज सादर करताना त्यासोबत **रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त)** इतके शुल्क भरणे अनिवार्य राहील. सदर शुल्क **कक्ष अधिकारी, रोख शाखा, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे सामान्य प्रशासन विभागाच्या रोख शाखेमध्ये प्रत्यक्ष रोखीने किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे, अथवा "००७०- इतर प्रशासकीय सेवा, ६०- इतर सेवा, ११९ लोकसेवा कसूरीबाबत दंड, (०१) महाराष्ट्र लोक सेवा हक्क कायदा-२०१५ दंड व शुल्क (००७००८६९०१)"** या लेखाशीर्षाखाली कोषागारात जमा करावे. शुल्क भरल्याची मूळ पावती/डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

३. नियुक्तीचा कालावधी:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १४(१) मधील तरतुदींनुसार राज्य सेवा हक्क आयुक्त ज्या दिनांकास पद धारण करतील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत अथवा त्यांच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पद धारण करतील. राज्य सेवा हक्क आयुक्त पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाहीत.

४. वेतन व भत्ते:-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १४(४) मधील तरतुदींनुसार, राज्य सेवा हक्क आयुक्तांना लागू असलेले वेतन, भत्ते व सेवेच्या इतर अटी व शर्ती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार राहतील. संबंधित आयुक्तांना निवृत्तिवेतन किंवा सेवानिवृत्ती लाभ मिळत असल्यास, लागू तरतुदींनुसार त्यांचे समायोजन करण्यात येईल. राज्य सेवा हक्क आयुक्तांचे मूळ वेतन प्रतिमाह रु. २,२५,०००/- इतके आहे.

५. निवड व नियुक्तीची कार्यपद्धती:-

(१) या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी शासन परिपत्रक क्र. आरटीएस-११२०/प्र.क्र.५५/१८(रवका), दिनांक २३ ऑक्टोबर २०२० अन्वये या प्रयोजनार्थ गठित सचिवस्तरीय छाननी समितीमार्फत करण्यात येईल.

५.३. छाननी समितीमार्फत तयार करण्यात आलेली संक्षिप्त यादी अंतिम निवड प्रक्रियेसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १३(३) अन्वये गठित मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर करण्यात येईल.

६. अर्ज सादर करण्याची पद्धत :-

६.१. पात्र व इच्छुक उमेदवारांनी या जाहिरातीसोबत जोडलेल्या विहित प्रपत्र -अ, जोडपत्र -ब व जोडपत्र -क मध्ये आवश्यक तपशील भरून अर्ज सादर करावा.

६.२. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, अनुभव प्रमाणपत्रे, सविस्तर बायोडेटा, कामगिरीचा तपशील व इतर आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. अर्ज शुल्क भरल्याचा पुरावाही जोडावा.

६.३. संपूर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रे बंद लिफाफ्यात पाठवावीत. लिफाफ्यावर **"राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक व छत्रपती संभाजीनगर विभाग पदासाठी अर्ज"** असे ठळक अक्षरांत नमूद करावे.

६.४ राज्य सेवा हक्क आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी त्यांचा तपशील मराठी किंवा इंग्रजीमध्ये सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र व जोडपत्रासह, लिफाफ्यावर " राज्य सेवा हक्क आयुक्त पदासाठी अर्ज " असे लिहून पोस्टाने, उप सचिव (लोकशाही दिन कक्ष), सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला, दालन क्र.६३१, विस्तारित इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ किंवा स्वःहस्ते किंवा ई-मेल : lokshahidin.gad@maharashtra.gov.in द्वारे दिनांक १६ **नोव्हेंबर, २०२६**, पर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत पाठवावेत.

६.६. राज्य शासन, केंद्र शासन किंवा अन्य कोणत्याही संघटनेत सेवेत असलेल्या अर्जदारांनी त्यांचा अर्ज विहित मार्गाने संबंधित प्रशासकीय मंत्रालय, विभाग किंवा सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत अंतिम दिनांकापूर्वी सादर करावा.

७. महत्त्वाच्या सूचना:-

(१)अर्ज अंतिम दिनांकापूर्वी किंवा त्या दिनांकापर्यंत पोहोचणे बंधनकारक आहे. उशिरा प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत

(२) अपूर्ण अर्ज, विहित नमुन्याशिवाय सादर केलेले अर्ज व शुल्क न भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(३) विहित नमुन्यातील अर्ज, जोडपत्रे व विस्तृत जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील.

(डॉ.अतुल पाटणे)
महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव

प्रपत्र – "अ"

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगातील राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक व छत्रपती संभाजी नगर विभाग या पदाच्या विचारार्थ पाठवावयाच्या तपशिलांचे प्रपत्र"

छायाचित्र

१. नांव :

२. जन्मदिनांक :

३. सध्याचा पत्ता :

४. संपर्क क्रमांक :

५. ई-मेल :

६. शैक्षणिक अर्हता :

७. प्रख्यात असलेले क्षेत्र :

८. सध्याचा व्यवसाय :

९. कामगिरी/कार्यानुभव (जोडपत्र प्रमाणे) :

१०. उमेदवार ज्या राज्य सेवा हक्क आयुक्त पदासाठी अर्ज करू इच्छित आहे त्याचे नाव :

अ) नाशिक	ब) छत्रपती संभाजी नगर	अ) व ब) दोन्ही

दिनांक :

ठिकाण :

सही :

संपूर्ण नांव :

जोडपत्र "ब"

अ.क्र.	पद	संघटना	कालावधी		कामगिरी/कार्यानुभव यांचा तपशिल (थोडक्यात)
			पासून	पर्यंत	

जोडपत्र "क"

राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक व छत्रपती संभाजी नगर विभाग या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या कामगिरीचा तपशिल (थोडक्यात)

GOVERNMENT OF MAHARASHTRA

General Administration Department

6th Floor, Extended Building,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai – 400 032.

Advertisement No :-GAD/69/2026-Lokshahi Din **Date:30** October, 2026

ADVERTISEMENT

Subject: Inviting applications for appointment to the posts of State Right to Public Services Commissioner, Nashik and Chhatrapati Sambhajinagar Divisions, in the Maharashtra State Commission for Right to Public Services.

The Government of Maharashtra has established the Maharashtra State Commission for Right to Public Services under the Maharashtra Right to Public Services Act, 2015. The said Commission functions to exercise the powers conferred upon it and to perform the functions assigned to it under the said Act. The headquarters of the Commission is situated in Greater Mumbai. The Commission comprises the State Chief Commissioner for Right to Public Services and six State Commissioners for Right to Public Services. There is a provision for appointing one State Commissioner for Right to Public Services for each Revenue Division, excluding the areas of Mumbai City and Mumbai Suburban Districts.

Applications in the prescribed format are invited from eligible and interested candidates for appointment to the posts of State Right to Public Services Commissioner, Nashik and Chhatrapati Sambhajinagar Divisions, in the Maharashtra State Commission for Right to Public Services, which are falling vacant.

1. Number of Vacant Posts

- State Right to Public Services Commissioner, Nashik Division: 1 post.
- State Right to Public Services Commissioner, Chhatrapati Sambhaji nagar Division: 1 post.

Total vacant posts: 2.

2. Other Terms and Conditions

(1) Basic Eligibility: The applicant shall be an eminent person in public life, having wide knowledge and experience in administration in the Government or a public authority, as stipulated under Section 13(5) of the Maharashtra Right to Public Services Act, 2015.

(2) Minimum Experience: The applicant shall have a minimum of 20 years of experience in the functioning of the Government or a public authority.

(3) Age Limit: As on the last date of submission of the application, the applicant shall be at least 45 years of age and shall not exceed 62 years of age.

(4) Educational Qualification: The applicant shall be a graduate in any discipline.

(5) Essential Skills: The applicant shall possess knowledge of relevant laws, an understanding of quasi-judicial procedures, transparency, administrative leadership and decision-making ability.

(6) Conditions Relating to Submission of Application: The application shall be submitted in the prescribed format. It shall be mandatory to submit a detailed biodata, particulars of experience and documentary evidence of work performed.

(7) Affidavit: The applicant shall submit an affidavit along with the application stating that no criminal offence has been registered against him/her, no criminal case is pending against him/her and, in the case of persons serving in Government or semi-Government service, no disciplinary proceedings are pending or proposed against him/her.

(8) Application Fee: An application fee of Rs. 1,000/- (Rupees One Thousand only) shall be payable along with the application. The said fee shall be paid either in cash or through a Demand Draft at the Cash Branch of the General Administration Department, Mantralaya, Mumbai, in favour of the Section Officer, Cash Branch, General Administration Department, Mantralaya, Mumbai, or deposited in the Treasury under the following Head of Account: "0070 – Other Administrative Services, 60 – Other Services, 119 – Fines and Penalties under Right to Public Services, (01) Maharashtra Right to Public Services Act, 2015 – Fines and Fees (0070086901)."

It shall be mandatory to attach the original receipt evidencing payment of the fee or the Demand Draft along with the application.

3. Tenure of Appointment

In accordance with the provisions of Section 14(1) of the Maharashtra Right to Public Services Act, 2015, the State Commissioner for Right to Public Services shall hold office for a period of five years from the date on which he/she assumes office, or until attaining the age of 65 years, whichever is earlier. The State Commissioner for Right to Public Services shall not be eligible for reappointment.

4. Salary and Allowances

In accordance with the provisions of Section 14(4) of the Maharashtra Right to Public Services Act, 2015, the salary, allowances and other terms and conditions of service applicable to the State Commissioner for Right to Public Services shall be as per the prevailing rules of the Government. Where the concerned Commissioner receives pension or retirement benefits, the same shall be adjusted in accordance with the applicable provisions. The basic salary of the State Commissioner for Right to Public Services is Rs. 2,25,000/- per month.

5. Selection and Appointment Procedure

(1) Applications received up to the last date specified in this advertisement shall be scrutinised by the Secretary-level Scrutiny Committee constituted for this purpose under Government Circular No. RTS-1120/CR-55/18 (RWK), dated 23 October 2020.

(2) The shortlist prepared by the Scrutiny Committee shall be submitted to the Committee constituted under Section 13(3) of the Maharashtra Right to Public Services Act, 2015, under the chairpersonship of the Hon'ble Chief Minister, for the final selection process.

6. Procedure for Submission of Applications

6.1. Eligible and interested candidates shall submit their applications by filling in the required details in the prescribed Form 'A' and Annexures 'B' and 'C' enclosed with this advertisement.

6.2. Self-attested copies of educational qualification certificates, proof of age, experience certificates, detailed biodata, particulars of achievements and other necessary documents shall be attached to the application. Proof of payment of the application fee shall also be enclosed.

6.3. The complete application along with the necessary documents shall be sent in a sealed envelope. The envelope shall be prominently superscribed with the words: "Application for the Post of State Commissioner for Right to Public Services, Nashik and Chhatrapati Sambhajinagar Divisions".

6.4. Interested persons fulfilling the eligibility criteria for appointment to the post of State Commissioner for Right to Public Services shall submit their particulars in Marathi or English, along with the prescribed form and annexures enclosed herewith. The envelope shall be superscribed with the words "Application for the Post of State Commissioner for Right to Public Services".The application shall be sent by post to the following address, submitted in person, or sent by e-mail: lokshahidin.gad@maharashtra.gov.in

To,
The Deputy Secretary (Lokshahi Din kaksh),
General Administration Department,
6th Floor, Room No. 631, Extension Building,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai – 400 032.

Applications shall be submitted on or before **16 November 2026, up to 6:00 p.m.**

6.6. Applicants serving in the State Government, Central Government or any other organisation shall submit their applications through the proper channel, through the concerned Administrative Ministry, Department or Competent Authority, before the last date.

7. Important Instructions

(1) It is mandatory for applications to reach the concerned office on or before the last date. Applications received after the prescribed deadline shall not be considered.

(2) Incomplete applications, applications submitted otherwise than in the prescribed format, and applications for which the prescribed fee has not been paid shall not be considered.

(3) The prescribed application form, annexures and detailed advertisement shall be available on the Government of Maharashtra website, www.maharashtra.gov.in.

(Dr. Atul Patne)
Principal Secretary to the Government of Maharashtra

ANNEXURE "A"

PROFORMA FOR SENDING PARTICULARS FOR CONSIDERATION FOR THE POST OF STATE COMMISSIONER FOR RIGHT TO SERVICE IN OFFICE OF THE MAHARASHTRA STATE COMMISSION FOR RIGHT TO SERVICE, NASHIK and CHATRAPATI SAMBHAJI NAGAR

PHOTO

1. **Name** :
2. **Date of Birth** :
3. **Present Address** :
4. **Contact Number** :
5. **E-Mail** :
6. **Educational Qualification** :
7. **Area of Eminence** :
8. **Present Occupation** :
9. **Achievements/Work Experience** :
   (As per Annexure)
10. **Name of the State Right to Service Commission for which the candidate wishes to apply** :

A)Nashik	**B) Chhatrapati Sambhaji Nagar**	**A) & B) both**

Date :

Place :

Signature

(Full name of the candidate)

ANNUXURE "B"

Sr.No.	Post	Organisation	Period		Details of Achievements/ Work Experience (in brief)
			From	TO	

******

ANNEXURE "C"

Details of Achievements/ Work Experience (in brief) of the Candidate applying for the post of State Commissioner for Right to Service, Nashik and Chhatrapati Sambhaji Nagar Division

----

--------------.